# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.08.2026** **वारःशुक्रवार**

---

1. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती आज देशवासीयांना संबोधित करणार,
2. संसदेचं पावसाळी अधिवेशन संस्थगित, अधिवेशनाचा बराचसा कालावधी गोंधळामुळे वाया गेला तरी 12 विधेयकांना मंजुरी,
3. जुलैमध्ये देशाच्या निर्यातीत गेल्या वर्षीच्या तुलनेत 13 टक्क्यांनी वाढ,
4. उत्तराखंडमध्ये बांधकाम सुरू असलेल्या बोगद्यावर दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत 7 जणांचा मृत्यू आणि,
5. राष्ट्रकूल तलवारबाजी स्पर्धेत 35 पदकांसह भारताला सर्वसाधारण विजेतेपद.

**<u>राष्ट्रपती संदेश</u>**

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज देशवासियांना संबोधित करणार आहेत. आज संध्याकाळी 7 वाजता आकाशवाणी आणि दूरदर्शनवरुन हिंदी आणि इंग्रजीतून हा संदेश प्रसारित होईल. त्यामुळं आकाशवाणीवरचं संध्याकाळचं प्रादेशिक बातमीपत्र आज पावणे 7 वाजता प्रसारित होणार आहे. राष्ट्रपतींच्या या संदेशाचा प्रादेशिक भाषांमधला अनुवाद रात्री साडेनऊ वाजता आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात येईल.

**<u>फाळणी विभीषिका</u>**

देशात आज फाळणी विभीषिका स्मृतीदिन पाळण्यात येत आहे. यानिमित्त 1947 मध्ये देशाच्या फाळणीवेळी प्राण गमावलेल्यांना आणि त्याच्या भयंकर वेदना सहन केलेल्यांना आदरांजली वाहण्यात येत असून त्यासाठी राजधानी दिल्लीसह देशभरात इतरत्रही विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. भारत स्वतंत्र होताना त्याच्या विभाजनावेळी झालेल्या प्रचंड हिंसाचारामुळे लाखो लोकांच्या मनाला खोलवर झालेल्या वेदनांची पुढील पिढ्यांना जाणीव असावी या उद्देशानं 2021 पासून दरवर्षी 14 ऑगस्टला दिन पाळण्यात येतो.

**<u>मोदी-विभाजन विभिषिका</u>**

फाळणी स्मृति दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर संदेश प्रसारित केला आहे. फाळणीच्या वेदना ज्यांना सहन कराव्या लागल्या, त्या नागरिकांचं पंतप्रधानांनी स्मरण केलं आहे. अनेक वेदानांची आठवण करून देणारा हा दिवस, मानवी धैर्याची, सामर्थ्याची जाणीवही आपल्याला करून देतो;

त्यानिमित्तानं देशात सलोखा आणि बंधुभाव जपण्याचा आपला संकल्प अधिक दृढ करूया, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

**स्वातंत्र्यदिन**

स्वातंत्र्यदिनानिमित्त राजधानी दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या सकाळी 7 वाजता ध्वजारोहण होणार आहे. त्यांनतर पंतप्रधान राष्ट्राला संबोधित करतील. ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाचं थेट प्रसारण आकाशवाणीवरून करण्यात येणार आहे. या मुळे उद्या सकाळी आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या प्रादेशिक बातम्या सकाळी 6 वाजून 40 मिनिटांनी प्रसारित होतील.

**सीजेआय**

उद्या साजऱ्या होत असलेल्या स्वातंत्र्यदिनाच्या अनुषंगाने देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी काल राजधानीत दिल्लीत सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात दिव्यांग व्यक्तींशी विशेष संवाद साधला. या संवादादरम्यान, न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी त्यांचे अनुभव जाणून घेतले तसंच त्यांच्या कर्तृत्वाचं कौतुक केलं. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणारे पॅरालिम्पिक खेळाडू, शासकीय अधिकारी, शिक्षणतज्ज्ञ आणि उद्योजक अशा दिव्यांग व्यक्ती उपस्थित होत्या.

**संसद**

संसदेचं पावसाळी अधिवेशन काल अनिश्चित कालावधीसाठी संस्थगित करण्यात आलं. या अधिवेशनाच्या काळात एकंदर 12 विधेयकं मंजूर करण्यात आली.

संपूर्ण अधिवेशन काळात विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून घातलेल्या गदारोळामुळे कामकाजात वारंवार व्यत्यय आल्यामुळे लोकसभेत केवळ 19 टक्के तर राज्यसभेत 39 टक्के कामकाज झालं. विरोधकांच्या या वर्तणुकीबद्दल राज्यसभेचे अध्यक्ष सी पी राधाकृष्णंन यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.
अधिवेशनानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत संसदीय कामकाज मंत्री किरेन रीजीजू यांनीही विरोधकांवर टीका केली. सरकारनं चर्चेला तयार असल्याचं सांगूनही त्याला प्रतिसाद न देता गोंधळ सुरू ठेवण्यातून विरोधकांची पराभूत मानसिकता स्पष्ट होते, असं रीजीजू म्हणाले.

पावसाळी अधिवेशनात संसदेनं 12 विधेयकांना मंजुरी दिली. त्यामध्ये पेपरफुटी प्रकरणी कठोर शिक्षेची तरतूद असलेल्या तसंच केरळचं नाव बदलून केरळम करण्यासंबंधीच्या विधेयकांचा समावेश आहे. बहुतांश विधेयक चर्चेशिवाय मंजूर करण्यात आली.

अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर काल लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी आयोजित केलेल्या पारंपरिक चहापानाच्या कार्यक्रमावर काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि समाजवादी पक्षाने बहिष्कार टाकला. मात्र, द्रविड मुन्नेत्र कळघमच्या नेत्या कनिमोळी या पारंपरिक स्नेहभेटीला उपस्थित होत्या. मात्र राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमाला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि पक्षाच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांच्यासह विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते.

**जयशंकर लायबेरिया चर्चा**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि लायबेरियाच्या परराष्ट्र मंत्री सारा बेसोलो न्यांती यांनी काल नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा केली. या चर्चेत त्यांनी तंत्रज्ञान, कृषी, आरोग्य, खाणकाम, ऊर्जा, व्यापार आणि गुंतवणूक, शिक्षण, क्षमता बांधणी आणि परस्पर जनसंपर्क यांसारख्या क्षेत्रांतील भारत आणि लायबेरिया दरम्यानच्या संबंधांच्या सर्व पैलूंचा आढावा घेतला. नवी दिल्लीत लायबेरियाचा दूतावास सुरू झाल्याबद्दल डॉ. जयशंकर यांनी परराष्ट्र मंत्री न्यांती यांचं अभिनंदन केलं.

**निर्यात वाढ**

देशाच्या एकंदर निर्यातीत गेल्या म्हणजे जुलै महिन्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत 13 टक्के वाढ नोंदवली गेली आहे. जुलैमध्ये देशानं व्यापारी आणि सेवा या दोन्हींची मिळून 80 पूर्णांक 14 शतांश अब्ज अमेरिकन डॉलर्सची निर्यात केली. वाणिज्य मंत्रालयाच्या उपलब्ध माहितीवर आधारित तात्पुरत्या आकडेवारीनुसार व्यापारी निर्यातीत झालेल्य साडे 19 टक्क्यांहून अधिक वाढीचा या वाढीत मुख्य वाटा आहे. पेट्रोलियम उत्पादनं, इलेक्ट्रॉनिक वस्तू, अभियांत्रिकी वस्तू, रसायनं तसंच सुती धागा आणि हातमाग उत्पादनांमुळे या वाढीला चालना मिळाली.

**संगीत नाटक**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत 2024-25 या वर्षासाठीचे संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आले. संगीत, नृत्य, नाटक, लोककला, आदिवासी कला, बाहुलीनाट्य आणि नाट्य अशा विविध कला प्रकारांमधे भरीव योगदान देणाऱ्या 40 मान्यवरांना 3 लाख रुपयांची गौरववृत्ती प्रदान करण्यात आली. ज्येष्ठ गायक अरुण कशाळकर यांचा त्यात समावेश आहे. तसंच या क्षेत्रांमधल्या 108 यशस्वी कलाकारांना प्रत्येकी एक लाख रुपयाचे संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आले. राष्ट्रपतींनी त्यांना ताम्रपट, आणि शाल श्रीफळ देऊन सन्मानित केलं. त्याखेरीज युवा कलावंतांना दिले जाणारे उस्ताद बिस्मिल्लाखाँ युवा पुरस्कार यंदा देशातल्या 106 कलाकारांना प्रदान करण्यात आले.

गायक आनंद भाटे, मुकुंद मराठे, सनईवादक शैलेश भागवत, नृत्यांगना शुभदा वराडकर, मनीषा साठे, संगीतकार अशोक पत्की, अभिनेता अरुण नलावडे, दिग्दर्शक प्रमोद पवार या महाराष्ट्रातल्या 9 दिग्गज कलावंतांसोबत गायक कृष्णा बोंगाणे, अंकिता जोशी, भारूड गायक भावार्थ देखणे,कठपुतळी कलावंत बालकृष्ण मासगे, संवादिनीवादक तन्मय देवचके, आणि जागर कलावंत प्रवीण जाधव या 6 युवा कलावंतांना यंदा हा पुरस्कार मिळाला आहे.

**दिल्ली हल्ला**

राजधानी दिल्लीत लाल किल्ला परिसरात गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये झालेला दहशतवादी हल्ला, 'अल-कायदा इन इंडियन सबकॉन्टिनेंट' या संघटनेनं केला असल्याचंसंयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं म्हटलं आहे. मोठ्या संघटनेच्या माध्यमातून काम करण्याऐवजीलहान गटांच्या माध्यमातून काम करत AQIS या संघटनेनं मोठं आर्थिक जाळ निर्माण केलं आहे; बांगलादेशातही आपला गट स्थापनकरण्याचा या संघटनेचा

प्रयत्न आहे. त्यामुळे दक्षिण आशियात दहशतवादी हल्ल्यांचा धोकावाढला असल्याचा इशारा संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवाद-विरोधी देखरेखपथकानं दिला आहे.

**चमोली-अपघात**

उत्तराखंड मधील चमोली जिल्ह्यात काल संध्याकाळी एका जलविद्युत प्रकल्पाच्या ठिकाणी निर्माणाधीन असलेल्या बोगद्यावर दरड कोसळून आणि पाणी झिरपून झालेल्या दुर्घटनेत 7 जणांचा मृत्यू झाला तर 14 कामगार जखमी झाले आहेत. या बोगद्यात 22 कामगार काम अडकले होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस, राज्य आपत्ति प्रतिसाद दल आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलासह इतर यंत्रणा घटनास्थळी मदतीसाठी दाखल झाल्या आहेत. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या घटनेबद्दल चिंता व्यक्त केली असून  सर्व यंत्रणांना युद्धपातळीवर मदत आणि  बचाव कार्य करण्याचे निर्देश दिले.

**कॉमनवेल्थ फेन्सिंग**

नायजेरियातील लागोस इथं चार दिवस झालेल्या राष्ट्रकूल तलवारबाजी अजिंक्यपद स्पर्धेमध्ये भारतानं एकूण 35 पदकं जिंकून सर्वसाधारण विजेतेपद पटकावलं. या स्पर्धेत 23 वर्षाखालील ' आणि वरिष्ठ अशा दोन्ही गटांत भारतीय खेळाडूंनी 13 सुवर्ण, 8 रौप्य आणि 14 कांस्य पदकं जिंकली. स्पर्धेच्या चौथ्या आणि अंतिम दिवशी भारताच्या वरिष्ठ तलवारबाजांनी सहापैकी 5 सुवर्णपदकं पटकावली.

**हवामान**

छत्तीसगढ मध्ये आज अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. तसच पश्चिम बंगालचा काही भाग, हिमाचल प्रदेश,झारखंड,ओदिशा आणि उत्तराखंडमध्येही अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तामिळनाडू, पुद्दुचेरीमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज हवमान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.